Asst. Std. Exam - 2009

MAT

**प्रश्नपत्रिका क्रमांक 1** 100605

**( मराठी व प्रशासनिक लेखन )**

**वेळ : 3 तास ]** **कमाल गुण : 100**

**सूचना** - (1) सर्व प्रश्न **आवश्यक** आहेत.

(2) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

(3) उमेदवाराने परीक्षा क्रमांक, आपल्या स्वत:च्या नावासह कोणतेही नाव, स्वाक्षरी पत्ता अथवा त्याची ओळख दर्शविणारे कोणते ही चिन्ह, लिखाण उत्तर पुस्तिकेत करू नये, तसे केल्यास तो शिक्षेस पात्र ठरेल.

1. **परिशिष्ट 'अ'** मधील उताऱ्याचा गोषवारा सुमारे 150 शब्दांत लिहा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **15**

2. **परिशिष्ट 'ब'** मधील उताऱ्याचा गोषवारा सुमारे 150 शब्दांत लिहा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. **15**

3. **परिशिष्ट 'क'** मधील इंग्रजी उताऱ्याचे सुबोध मराठी भाषांतर करा. **10**

4. खालील चारांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे 250 शब्दांचा निबंध लिहा : **20**

   (a) शासनाचे विशेष आर्थिक क्षेत्राबद्दलचे धोरण

   (b) पंचायत राज

   (c) मी शासकीय अधिकारी झालो तर

   (d) आदर्श निवडणूक पद्धत

5. **परिशिष्ट 'ड'** मधील पत्राधारे गुणवत्तापुर्ण कार्यालयीन टिप्पणी तयार करा. **10**

6. **परिशिष्ट 'ई'** मधील टिप्पणी आधारे खाली नमूद केल्या प्रंमाणे कार्यवाही करा :

   (अ) शासन परिपत्रक तयार करा. **5**

   (ब) अर्ध शासकीय पत्र तयार करा. **5**

**Marks**
**गुण**

7. **( अ )** कंसातील वाक्प्रचारांचा बिनचूक उपयोग करून दिलेली वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतीही **पाच**) : **5**

(नाचता येईना अंगण वाकडे, बुडत्याला काडीचा आधार, चकाकते ते सारेच सोने नसते, गरज सरो नि वैद्य मरो, सुपारी दिली, वारी करीत आहे, औषधालादेखील नाही, कपिलाषष्ठीचाच योग)

(a) आज घरात साखरेचा एक कण सुद्धा शिल्लक नाही.

(b) घर घेण्याचे निश्चित ठरताच आजच मी शामरावांशी करार केला.

(c) गोविंदा गेली चार वर्षापासून एस.एस.सी. च्या परिक्षेला बसत आहे.

(d) 20-20 च्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंना विश्वविजयाचा फारच दुर्मिळ योग आला होता.

(e) ऑलंपिकच्या धावण्याच्या स्पर्धेत आपण नेहमी धावपट्टीला दोष देत असतो.

(f) परीक्षेत पास झाल्याबरोबर विशाल त्याच्या मदत करणाऱ्या मित्रांना विसरला.

(g) रमेशने फार दुर्मिळ संधी मिळाली म्हणून विदेशात जाऊन नोकरी करु नये.

**( ब )** खालील अशुद्ध उतारा व्याकरण दृष्टया व नियमानुसार शुद्ध करून लिहा : **5**

त्या चढत्या रात्री महात्मा जोतीरावांना काहि केल्या झोप येत नव्हती. डोक्यात विचारांचा दर्या उसळला होता गावात जोती आणि त्याची बायको बाटल्याच्या अफवा उठल्या होत्या. जोतीरावांना त्याच काही वाटत नव्हतं. वाटत होतं, ते वर्णवर्चस्वाच्या कुलंगड्यात अडकलेल्या मित्रांबद्दल. मेकॉलेच्या विळख्यात सापडलेल्या तरुण पिढीबद्दल. मेकॉलेच्या झिरपणीतुन काळ्या रंगाची गोरी नोकरशाही बाहेर पडणार होती. तीच पिढी सरकारी नोकरीत शिरून अधिकाराच्या जागा बळकावत होती आणि आपल्या देशबांधवांना छळत होते. राज्य साहेबांचं, परंतु सत्ता नोकरशाहीची, अशी सारी अवस्था होती काळ्या कलमबहादुरांच्या नोकरशाहीच्या वरवंट्याखाली शूद्रातिशूद्र माणूस भरडून निघत होता. साहेबासारखा सूट - टाय करून हींडणाऱ्या नव्या पिढीला मराठी बोलायची लाजा वाटत होती. आपल्याच समाजबांधवांना अज्ञ म्हणून हिणवण्यात धन्यता वाटत होती

8. **( अ )** खालील शब्दांच्या जाती कंसात नमूद केल्याप्रमाणे लिहा. (कोणत्याही **तीन**) : **3**

(a) कैकयीला दशरथाने दोन वर दिले. (नाम ओळखा)

(b) तू त्या राजपुत्राला वर. (क्रियापद ओळखा)

(c) पक्षी <u>झाडावर</u> बसतो. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(d) बाण खालून वर गेला. (क्रियाविशेषण)

(e) वर-पिता मुलाच्या लग्नात तोऱ्यात वावरत होता. (विशेषण ओळखा)

Marks
गुण

**( ब )** खालील शब्दांची कंसात दाखविल्याप्रमाणे रुपे लिहा. (कोणतीही **दोन**) : 2

(a) नरेश परीक्षेत उत्तम गुणांनी पास होणार. (काळ ओळखा)

(b) सध्या केन्द्र शासन अनेक राजकीय पक्ष मिळून चालवित आहे. (अनेक वचनी वाक्य करा)

(c) सानिया मिर्झा उत्कृष्ट टेनिसपटू आहे. (विशेषण ओळखा)

9. **( अ )** खालील शब्दांची शब्दसिध्दीच्या दृष्टीने फोड करून त्यांचा अचूक अर्थ लिहा. (कोणत्याही **तीन**) : 3

(a) मधून मधून (b) समोरासमोर (c) घर

(d) गाव (e) कोवळा

**( ब )** खालील इंग्रजी पारिभाषिक शब्दांचे मराठी प्रतिशब्द लिहा. (कोणतेही **दोन**) : 2

(a) Bill (b) File (c) Speak

## परिशिष्ट ''अ''

एकदा एक अधिकारी महाराजांना सांगू लागले, ''महाराज, तुम्ही या लोकांना एवढा जीव लावतायसा, पर त्यांच्या अंगावरल्या उवा काही जात नाही त्या बगा.'' त्याला महाराज म्हणाले, ''अरं, असू दे. आज ना उद्या त्या जातील्या. पर एवढ्या कश्याला? आपला देहच किड्यांनी बनलाय. त्याचं काय?'' ऑडिटरनी ऑबजेक्शन घेतलं. त्याला महाराज म्हणाले, ''हे सारं तोट्यात हाय म्हणतासा, बरं. आता घरात कोण आजारी आसलं तर त्याच्यावरला खर्चबी तोट्यातच आसतुया की! त्याचा कवा इचार करतासा? किती दवा दिली? किती दूध दिलं? किती फळं दिली? त्याचा इचार करता येत नाही. पेशंट जगला पायजे. तसं हेबी आजारी पेशंटच हायेत. त्यास्नीबी किती खर्च केला हे बगायचं न्हाय.'' तर एकजण म्हणाला, ''महाराज, चांगल्या, सुंदर इमारती गावात उभ्या केल्या तर गावाच्या सौंदर्यात भर तरी पडेल.'' त्याला महाराज म्हणाले, ''चांगल्या, सुंदर इमारती तुम्ही म्हणता तशा गावात बांधल्या गेल्यास गावास प्रेक्षणीय रूप येईल हे खरं. पण इमारती बांधण्याच्या बाबतीतलं माझं अज्ञान तुम्हांला दिसून आलं तर तुम्ही हसू लागाल. भिंतीत दरवाजे, खिडक्या कोठे घातल्या असता चांगल्या दिसतील हे पाहण्याकरिता मी प्रथम ती भिंत पुरी बांधून घेतो व दरवाजाच्या व खिडक्यांच्या जागा निश्चित करून त्या ठिकाणी भगदाडं पाडून दरवाजे व खिडक्या बसवून घेतो. अशा माझ्यासारख्या अडाणी माणसाशी इमारतींच्या सौंदर्याच्या चर्चा तुम्ही करू लागला तर माझा अडाणीपणा मी तुम्हांला कसा सांगू? हा प्रश्न मला भंडावतो आहे. वरकरणी दिसणाऱ्या इमारतींच्या सौंदर्यातच मी समाधान मानत बसू की आज कामावर असलेल्या या मंडळींच्या आशीर्वादात आनंद मानू? तुम्हांला खरंच का वाटतं, की इतकी माणसं जेवल्यानं मिळणाऱ्या आशीर्वादापेक्षा इमारतीचं सौंदर्य अधिक महत्त्वाचं आहे? माझ्या या सर्व इमारती कमी खर्चात होतात म्हणून मला यांना काम देणं परवडतं.''

या बांधा-पाडा योजनेनंतर महाराजांनी या मंडळींना रस्त्याच्या कामावर पाठवलं. तेथून त्यांना राधानगरी धरणावर पाठवलं. उपेक्षित भिकाऱ्यांना कष्टाची शिकवण दिली. त्यांचं पुनर्वसन केलं. घरं बांधून दिली. मुलांना शिक्षणाचा पहिला स्पर्श झाला तो या सोनतळी कॅम्पवर. महाराजांनी सुरू केलेली ही भटक्या-विमुक्तांची शाळा कदाचित यांच्या इतिहासात पहिली शाळा असावी. खर्च अर्थात महाराजांचा. उत्तम घोड्यांचा तबेला जेवढा उत्तम, जंगली जनावरांएवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जीव की प्राण अशा या जमाती महाराजांचे अंगरक्षक. पोलीस, निरोपे, शिकारी, साथी अशा अनेक स्वरूपांत महाराजांनी त्यांना संधी दिली. जमिनी दिल्या. घरदारं बांधून दिली. ज्यांना वाशाचं खोपाट नव्हतं त्यांना घर दिलं. जमीन दिली. शेतकरी बनवलं. शाळा काढून शिकवलं. माणसांत आणलं. त्यांनी आपलं पूर्वजीवन विसरावं, पूर्वचरित्र बदलावं, अवैध असलेलं व समाजघातक असलेलं चोरीसारखं कर्म सोडावं, कष्ट करून पोट भरावं, संसार करावा म्हणून त्यांचा आयुष्यभर प्रयत्न होता. केवळ तळमळ वाटते म्हणून लोकजीवनात परिवर्तन होत नसतं. 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात, जेवोनिया तृप्त कोण झाला?' त्यासाठी त्या लोकांची सद्य:स्थिती बदलता येईल अशी कृती करायला हवी. परिवर्तन ही केवळ बोलण्याची गोष्ट नव्हे, तर त्यागपूर्वक, कष्टपूर्वक करण्याची गोष्ट आहे. फासेपारध्यांच्या पोटाचा प्रश्न सोडवल्याशिवाय ते चौर्यकर्म सोडू शकत नाहीत. केवळ नीतीचे धडे देऊन पोट भरत नसते. त्यांच्या पोटाचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी, त्यांच्या जीवनाला शाश्वती व स्थैर्य आणण्यासाठी निश्चित स्वरूपाची, कायम उत्पन्नाची तरतूद करायला हवी. याचा अर्थ पारध्यांसारख्या जमातीचं जीवन आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीवर अवलंबून आहे. शिवाय सामाजिक दृष्टिकोन, फासेपारध्यांचं शैक्षणिक मागासलेपण व त्यांची न्यूनगंडानं पछाडलेली मानसिकता हे या स्थित्यंतराचे आणखी तीन घटक आहेत. तथापि, सर्वांत महत्त्वाचा घटक आर्थिक. तो सोडवल्याशिवाय गत्यंतर नाही.

दीन-दलितांच्या जीवनात नवीन प्रभात यावी, त्यांनी माणसात यावं म्हणून आभाळाची माया घेऊन जन्माला आलेल्या या राजानं आपल्या पंखांखाली उपेक्षितांना सावली दिली, माउलीची माया दिली आणि सत्तेच्या बळाची ऊबही दिली. भटक्या-विमुक्तांच्या पुनर्वसनाचे महाराजांनी केलेले प्रयत्न खरोखरच अलौकिक स्वरूपाचे आहेत.

## परिशिष्ट ''ब''

अलिबागला गेलात, की केवळ समुद्राच्या काठाकाठाने न भटकता आजूबाजूला असलेल्या महत्त्वाच्या गोष्टी बघणेही तितकेच आनंदाचे असते. जसे निसर्गप्रेमी सलीम अली यांचे 'किहिम' गाव अलिबागपासून हाकेच्या अंतरावर आहे. समजा, थोडंसं लांब असलं, तरीही कंटाळा करता कामा नये. प्रवासी माणसाला पाय मोकळे करण्याची सवय असावीच लागते. ती असली की जंगल, दऱ्याखोरी आपलीशी होऊन जातात. डोंगराच्या कपारीतून खळाळत येणाऱ्या जलधारा डोळ्यांना सुखावून जातात. निसर्गवेड्यांना परकं काही नसतं. निसर्गसौंदर्याचं वेड जगण्याला ऊर्मी देतं. 'किहिम' परिसरात पसरलेल्या हिरवाईनं पसरून टाकलेला उत्साह आपल्यालाही भरून घेता येतो. उंच, खुज्या, सडपातळ झाडांच्या सावल्यांचा खेळ रंगात आलेला असतानाच तो बघावा. पाखरं चिवचिवतात, गाणं म्हणतात. या फांदीवरून त्या फांदीवर प्रवास करतात. हा प्रवास पंखांत बळ साठवून केलेला असतो. या बळाचे चित्र सलीम अली यांनी आपल्या लेखनात रंगवले आहे.

सगळ्यांना एकाच रंगाची आवड नसते. वेगवेगळ्या रंगांची निसर्गाने रंगवलेली आकाश-गोधडी बघत बघत पाखरांचा संसार जवळ करायचा असतो. ती एकमेकांशी बोलतातही, त्यांना एकमेकांच्या डोळ्यांची भाषा कळते. आपण जसा लेकरांना घास भरवतो, तसाच घास पक्षिणी भरवताना दिसतात. झाडांच्या गळून पडलेल्या बिया, चिबड-चिबड मातीतून उचलून स्वच्छ करून भरवताना त्यांच्या चोचीला आनंद वाटतो. अशा वेळी वाटतं, की सगळ्यांना सगळं करण्यासाठी निसर्गानं दिलेलं स्वातंत्र्य आपणाला 'किहिम' सारख्या गावात पाहायला मिळतं. प्राणितज्ज्ञ सलीम अली या छंदवेड्या माणसामुळे सागराच्या गाण्याबरोबरच मोहरीच्या आकाराएवढी वाळू पायाखाली घेऊन चालणं, हादेखील आनंदाचाच भाग. पायांतील वहाण काढून ठेवून वाळूच्या सुखद स्पर्शासाठी असं चालणंदेखील आरोग्याला उपकारक असतं.

जेव्हा झाडांचे शेंडे एकमेकांना भेटतात तेव्हा पालवीचा रंग बदलतो. प्रत्यक्षात तसे घडत नसले, तरी डोळ्यांना तसा भास होतो. मग भास-आभासांचे नृत्य सुरू होते. झाडाचा पाचोळा चुरचुरतो. त्याचेही काही म्हणणे असते. ते म्हणणे म्हणजे, 'मीही काही दिवसांपूर्वी हिरवागर्द होतो. बघता बघता पिवळा पडलो, पाचोळा झालो. पाचोळा झाल्यावर तुमच्या पावलांना मी स्वीकारलेले आहे. तेव्हा जरा जपून. अजूनही आमचा उपयोग संपलेला नाही.' चालता चालता असं काही मनात येतं. बियाण्यानं मातीत रुजावं तसं रुजत जातं. रुजावं कसं? वाढावं कसं? फुलावं कसं? या सगळ्या गोष्टी 'किहिम' च्या निसर्ग परिसरात अनुभवायला मिळतात. काही फुलांना सुगंध नसला तरी दुर्गंधही आढळत नाही. अगदी सुगंधी फुलांच्या थाटातच त्यांचं जगणं असतं. हे फूल नाजूक असतं. त्याला कोणी देवाच्या चरणी अर्पण करत नाही. अर्घ्याच्या ताटात जागा देत नाही. एवढंच काय, ललनेच्या मलमली केसांत जाऊन बसण्याचीही या फुलाला परवानगी नाही. ते उमलतं खडकावर आणि कोमेजतंही खडकावर. तसं याला वनस्पतिशास्त्रात नाव नाही. नाहीतरी आपण 'नावात काय असतं', असं म्हणतोच. खडकच ज्याचे जन्मठिकाण, त्याच्यावरून या फुलांना 'खडकपुष्प' का म्हणू नये?

सुगंधाचा गुण येण्यासाठी जन्मभूमीचा वास जन्मजात मिळावा लागतो. खडकाला वास नसल्यामुळे तिथे जन्मलेल्या फुलांनाही वास आला नाही असे म्हणता येईल. सुवास देणाऱ्या फुलांपेक्षाही खडकपुष्पाला लाभलेल्या सौंदर्याची व्याख्या कोणालाही करता येणार नाही. पांढऱ्या, पिवळ्या रंगाची नितळ झाक व नृत्यकुशल नर्तिकेसारखे झोकदार अंग हेसुद्धा वेगळे गुणवैशिष्ट्य नव्हे काय? सगळ्यांच्या पदरात सारखेच दान टाकले असते, तर वेगळेपणाचे सुख कसे मिळाले असते? ही फुलं तशी दुर्मिळ. मैल-दोन मैल चालून गेल्यानंतर जंगलवेलीवर त्यांची दुसरी भाऊबंदकी दिसते.

झाडांफुलांपेक्षा आणखी एका खेळात आपली मुलं रमतात. आपणही रमावं त्यांच्याबरोबर काही क्षण! ते ओल्या वाळूचा खोपा करतात. घर-घर म्हणून खेळतात. भविष्यकाळात त्यांनाही घर-घर खेळायचं असतं. त्याची खोपा ही सुरुवात असते.

मन पळत असतं. फिरत असतं. मनाचा भोवरा होतो. हा भोवरा गरगरत राहतो झाडांभोवती, वेलीभोवती, समुद्रात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाभोवती. पाण्यावर आलेल्या तरंगांवर, आकाशात, वाळूच्या वर्तुळात; सगळीकडे मनाला जाऊन यावंसं वाटतं इतका आत्मविश्वास 'किहिम'चा सागरकिनारा देऊन जातो.

## परिशिष्ट ''क''

Lokmanya Tilak was a great source of inspiration for our freedom struggle. He made the people aware of their social and political rights through his papers - 'Kesari', and 'Mahratta'. He started public festivals like 'Shivajayanti' and 'Ganeshotsava' and created a platform for the political awakening and education of people suffering under the British rule. He made the people aware of their rights as well as their duties.

In 1897, a terrible epidemic of plague broke out in Pune. Hundreds of people died. In those days, there was no cure for the disease and the epidemic spread like wildfire. The British Government took certain measures for controlling the epidemic and also started a hospital. Tilak's attitude towards these efforts of the Government was that of active co-operation. He persuaded the people to give up their superstitions and to handle the issue rationally. He also took initiative in organising the voluntary help offered by the people. But the British Government and their Anglo-Indian newspapers could not in any way appreciate these efforts.

## परिशिष्ट ''ड''

श्री. अ.ब.क.
गौतम नगर,
घर क्रमांक 13,
चंन्द्रपुर.

प्रती,

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई 400 032.

विषय : राज्यातील गरीब, अशिक्षित आणि गावात राहणाऱ्या नागरीकांची अंधश्रद्धेतून मुक्तता करणेबाबत.....

महोदय,

अनिष्ट व अघोरी प्रथा, जादुटोणा व पिशाच्चबाधा इत्यादींमुळे तसेच, वैदू व भोंदूबाबा यांच्याकडून समाजातील सामान्य, गरीब, अशिक्षित आणि मुख्यत: गावात राहणाऱ्या नागरीकांचे, मानसिक, शारीरिक वा आर्थिक नुकसान व शोषण होण्याच्या घटना फार मोठया संख्येने अत्यंत भयावह प्रमाणात उघडकीस आलेल्या आहेत.

जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती, वैदू व भोंदूबाबा यांचा आपल्याकडे अद्‌भूत व चमत्कारी उपाय किंवा शक्ती असल्याचा खोटा दावा आणि त्यांची समाज विघातक व नुकसान कारक कृत्ये यांमुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय, वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सामान्य जनतेच्या विश्वासाला तडा जाण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि या अंधविश्वासामुळे व अज्ञानामुळे ते अशा भोंदूबाबा आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा आश्रय घेत आहेत. अशा परिस्थितीत, जादूटोणा करणाऱ्या या व्यक्ती व भोंदूबाबा यांच्या कुटील कारस्थानांना बळी पडण्यापासून सामान्य, गरीब, अशिक्षित आणि खेड्यापाड्यात राहणाऱ्या नागरीकांना वाचवणे व अशा अनिष्ट परिणामांना परिणामकारकरित्या आळा घालण्यासाठी आणि त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी व या नुकसानकारक प्रथा, परिपाठ व रूढी, तसेच जादुटोण्यावरील विश्वास आणि अशा इतर अनिष्ट अघोरी प्रथा यांचा प्रसार रोखण्यासाठी उचित व कठोर सामाजिक व कायदेविषयक उपाययोजना शासनाने करणे आवश्यक आहे.

अशा अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादुटोणा या प्रथांचे उच्चाटन करण्याकरीता युती शासनाच्या काळात एका माननीय विधान परिषद सदस्याने अशासकीय विधेयक विधानमंडळाच्या सत्रातील विधान परिषदेच्या सभागृहात मांडले होते. परंतु ते मंजूर होऊ शकले नाही. तद्नंतर सन 2004 ला या सबंधात अध्यादेश जारी करण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य मंत्रीमंडळाने घेतला होता, परंतु त्यात काही त्रुटी असल्यामुळे अध्यादेश प्रस्थापित होऊ शकला नाही. नंतर महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाच्या खालच्या सभागृहात सदर विधेयक मा. मंत्री, सामाजिक न्याय यांनी वि.वि.क्र. 51/2005 मांडले होते परंतु ते विधेयक सभागृहात दाखल होताच सभागृहाच्या मान्यतेने परत घेण्यात आले होते. तदनंतर विधान सभा विधेयक क्रमांक 89/2005 सभागृहात सादर करण्यात आले परंतु परिषदेमध्ये सदर विधेयक विचारार्थ असतांना संयुक्त समितीकडे त्याची शिफारस करण्यात आली, अश्याप्रकारे सदर विधेयक प्रलंबीत आहे.

सदर विधेयक पारीत होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता दिसत आहे. परंतु वरील प्रथांना तात्काळ आळा घालणे आवश्यक आहे. म्हणून आपणांस विनंती आहे की सदर विषय हा जरी सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत येत असला तरी जोपर्यंन्त सदर विधेयकाचे अधिनियमात रुपांतर होत नाही तो पर्यंन्त अशा प्रथांना प्रतिबंध घालण्याकरिता गृह विभागाला आवश्यक ती उपाययोजना करायला सांगावे. तसेच गृह विभागाने आवश्यक ते परिपत्रक निर्गमीत करण्याचे निर्देश द्यावेत अशी नम्र विनंती आहे. कळावे.

आपला विश्वासू,

अ.ब.क.

## परिशिष्ट ''इ''

**( अ )** गट-अ व गट-ब (राजपत्रित) संवर्गातील पदोन्नतीच्या व सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येते. पदोन्नतीच्या व सरळसेवेच्या कोट्यातील गट **'ब'** (अराजपत्रीत) व गट-क संवर्गातील पदे विभागप्रमुखांमार्फत व गट-ड संवर्गातील पदे कार्यालय प्रमुखांमार्फत भरण्यात येतात.

सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यास दिलेली स्थगिती मा. उच्च न्यायालयाने उठविली आहे. त्यामुळे सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सर्व प्रशासकीय विभाग, विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी शिघ्रतेने करणे आवश्यक आहे. गट-ब (अराजपत्रीत) व गट-क संवर्गातील सरळसेवेची जिल्हास्तरीय पदे, जिल्हास्तरीय समितीमार्फत व प्रादेशिक व राज्यस्तरीय पदे अनुक्रमे विभागीय व राज्यस्तरीय निवड समित्यांमार्फत भरण्यात येतात, परंतु दि. 27.8.2007 च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निदेशानुसार बऱ्याच ठिकाणी क्षेत्रिय स्तरावर अद्याप कार्यवाही सुरु झालेली नाही. तरी रिक्त पदे भरण्याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन सरळसेवेची रिक्त पदे उपरोक्त निवड समित्यांमार्फत तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कालबद्ध कार्यक्रम विहीत करण्यात यावा. जेणेकरुन सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी तातडीने कार्यवाही करून रिक्त पदे लवकरात लवकर भरणे आवश्यक राहील. या सबंधात सबंधीत महसुली विभाग यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय आयुक्त आणि सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांना सूचना देण्यासाठी शासन परिपत्रकाचा मसुदा तयार करा.

**( ब )** उपरोक्त टिप्पणीतील आशय विचारात घेऊन गट 'ब' (अराजपत्रित), 'क' व 'ड' संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याकरीता अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांच्या स्वाक्षरीने सर्व विभागीय आयुक्तांना पाठवावयाच्या अर्ध शासकीय पत्राचा मसुदा तयार करा.

-oOo-